# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/परदेशी शिष्यवृत्ती/२०१९/ ३२८९ दिनांक: ०६.०८.२०१९

**परिपत्रक :**

विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजने अंतर्गत सन २०१९-२० करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत...

संदर्भ : तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे परिपत्रक जा.क्र. १९/डीटीई/परदेशी शिष्यवृत्ती/२०१८/१८० दि. ०६.०८.२०१९.

दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिताची जाहिरात दिनांक २२ जून, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. अर्ज online पध्दतीने करावयाचे असून अर्ज करण्याची वाढीव मुदत दिनांक २९ जुलै, २०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत होती. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती या विभागीय कार्यालयास सादर करण्याकरिताची वाढीव मुदत ३१ जुलै, २०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत होती.

**संदर्भिय परिपत्रकान्वये सदरची मुदत वाढवून आता online पध्दतीने अर्ज करण्याची मुदत २९ जुलै, २०१९ वरुन दिनांक १५ ऑगस्ट, २०१९ अशी करण्यात येत आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्र व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती या विभागीय कार्यालयास सादर करण्याकरीताची मुदत दिनांक ३१ जुलै, २०१९ वरुन दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.**

Gaikwad ६.८.२०१९

प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

D:\Yogesh Kelkar\Foreign Scholarship\Foreign Scolarship letter.docx